# दिनांक 12/03/2025

**1** अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 10/03/2025 रोजी 15:00 वा च्या सुमारास मौजे बॅक ऑफ बडोदा महेश टॉकिजच्या बाजुला अलिबाग येथे फिर्यादी रा.मेटपाडा कोळीवाडा अलिबाग यांचे स्कुटर क्र.एमएच-06-सिके-1318 च्या डिकित ठेवलेली श्रीकपा पतसंस्था अलिबाग खातेधारकांचे 65,000/-रुपये अज्ञात चोरटयाने गाडीच्या डिकितुन फिर्यादी यांच्या संमतीशिवाय स्वताच्या फायदयाकरीता चोरुन नेले.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे येथे गु.र.नं.41/2025, बी एन एस 2023 चे कलम 303(2),3(5)प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/पाटील हे करीत आहेत.

**2.** माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 11/03/2025 रोजी 02:15 वा च्या सुमारास मौजे माणगाव हददीत मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग लगत मोर्बा फाटा येथे ता.माणगाव येथे आरोपीत याने त्याच्या ताब्यातील इनोव्हा कार क्र - एम एच 12 जी झेड - 5816 ही मुबंई बाजुकडुन गोवा बाजुकडे चालवीत घेवुन जात असताना आरोपी रा. समर्थकपा सोसायटी ,फल्टॅ क्रं 13,रोड नं 13 बी, ठिंगरेनगर, पुणे 32, मुळ रा. वाठार किरोली, ता कोरेगाव, जि सातारा याने त्याच्या ताब्यातील इनोव्हा कार क्रं - एम एच 12 जी झेड - 5816 ही अतिवेगाने,हयगयीने बेदरकारपणे,रसत्याच्या परिस्थीकडे दुर्लक्ष करुन चालवुन सदरचे वाहन हे गोवा ते मुंबई लेनवर रॉंग साईडला आणुन यांतील फिर्यादी हे त्यांच्या ताब्यातील निसान सनी कार क्रं - एम एच 46 बी के - 3089 ही मुंबई ते गोवा रोडने मोर्बा बाजुकडे जाण्याकरिता उजवीकडे वळवीत असताना आरोपी याने त्याच्या ताब्यातील इनोव्हा कारने फिर्यादी यांचे ताब्यातील कारला समोरील उजव्या बाजुला जोरात ठोकर मारुन सदरची इनोव्हा कार ही मोर्बा फाटा येथील डाव्या बाजुला असलेल्या रोडचे कठडयाला जावुन धडकवुन अपघात करुन सदर अपघातामध्ये दोन्ही वाहनाच्या नुकसानीस व इनोव्हा कार मधील साक्षीदार याचे लहान व किरकोळ स्वरुपाचे दुखापतीस कारणीभुत झाला.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे येथे गु.र.नं.61/2025 भा.दं.वि.क.281, 281,125(a), मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/दर्शन दौडकुलर हे करीत आहेत.

**3.** खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 11/03/2025 रोजी 05:30 वा च्या सुमारास पुणे मुंबई

एक्सप्रेस हायवेवर कि.मी.नं.45ध्500 जवळ अमृतांजन ब्रिज येथे वळणावर आलेवेळी खोपोली ता.खालापुर येथे आरोपीत रा. मु.पो.मौनमपाडु, ता.संतनुतलपाडु जि.प्रकाशम रा.आंध्रप्रदेश याने त्याचे ताब्यातील कंटेनर टॅकर क्र. ए.पी.39.टी.ई.9742 हा अतिवेगाने, अविचारने, हयगयीने, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लेक्ष धोकादयरित्या चालवुन समोर चाललेल्या फिर्यादी यांचे ताब्यातील ट्र्व्हल्स बस क्र.एन.एल.01.बी.1796 व कार क्र. एम.एच.25. ए.डब्लु.9155 यास ठोकर मारून अपघात करून अपघातात स्वत:चे हातास व पोटास साध्या दुखापतीस व वरील तिन्ही वाहंनाचे नुकसानीस कारणीभुत झाला.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गु.र.नं.75/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 184, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 281,125(a) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/अमोल धायगुडे हे करीत आहेत.

**4.** कोलाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 10/03/2025 रोजी 17:00 वा ते दि. 11/03/2025 रोजी 17:00 वा च्या दरम्यान मौजे सावरवाडी गावचे हददीत सुतारवाडी येरळ रस्त्या लगत पो जामगाव ता.रोहा येथे एकूण 24,000/-रुपये किमतीचे ट्रान्सफार्मर मधील तांब्याचे कॉईल फिर्यादी रा.कोपरोळी ता.पेण परवानगी शिवाय स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता चोरून नेवुन ट्रान्सफार्मर मधील ऑइल सांडवुन नुकसान केले .

याबाबत कोलाड पोलीस ठाणे येथे गु.र.नं.20/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 303(2) 324(4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/पादीर हे करीत आहेत.

**5**. मांडवा सागरी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/06/2024 रोजी 00:00 वा ते दि. 11/03/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान मौजे कनकेश्वर मंदिर व मंदिराकडे जाणा-या पाय-यावर , अलिबाग येथे महिला फिर्यादी रा. गोंधळपाडा , अलिबाग हया कनकेश्वर मंदिर येथे दर्शनाकरीता मंदिराच्या पाय-यावरून ये-जा करीत असताना आरोपीत रा.शेखाचेगाव पो.नारंगी ता.अलिबाग याने फिर्यादी यांना थांबवुन तुमचा नंबर दया मला तुमचेशी बोलायचे आहे असे वारवांर बोलुन फिर्यादी यांचा पाठलाग करून त्यांना बघुन अश्लील हावभाव करून ओ माय स्विट डार्लिग आलिस तु असे अश्लील शब्द बोलुन फिर्यादी यांचे मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले.

याबाबत मांडवा सागरी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.21/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे 74,78(2),79 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/चेतन म्हात्रे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 11.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 413 इसमावर कायदेशीर कारवाई

करण्यात आली असून त्यांच्याकडून  3,75,200/-रुपये इतका दंड आकारला आहे.